क्रि.युएलपी.०७/२०२२ नि.क्र.

राहुल रामटेके –विरूध्द – अशोक वाडीभस्मे

सत्यापण

मी शपथेवर सांगतो की –

माझे नाव :– राहुल नकटुजी रामटेके

वय :– ६५वर्ष

धंदा :– सेवा निवृत्त

रा. :– ब्रम्हपुरी

जि. :– चंद्रपुर

०१. मी एस.टी. महामंडळामध्ये वाहक या पदावर काम करीत होतो. माझा गैरअर्जदारांनी दि.१५.०१.२०१६ च्या आदेशाव्दारे माझा मुळ पगार ३ टप्प्याने कायमस्वरूपी कमी केला होता. त्या आदेशा विरूध्द मी मा. औद्योगिक न्यायालय येथे प्रकरण क्र.२९/२०१६ दाखल केले होते. सदर प्रकरणामध्ये मा. औद्योगिक न्यायालय, चंद्रपुर यांनी दि.०४.०२.२०१९ रोजी आदेश पारीत करून दि.१५.०१.२०१६ रोजी गैरअर्जदार यांनी पारीत केलेला आदेश रदद बातल केला व गैरअर्जदारांना सदर ३ टप्प्याने कमी केलेला मुळ पगार पुन्हा जसा च्या तसा देवुन थक बाकी रक्कम देण्याचा आदेश दिला. सदर पगाराची थक बाकी ची रक्कम गैरअर्जदार यांनी मला अदयाप पर्यंत दिली नाही. दि.१५.०१.२०१६ चा गैरअर्जदारांनी दिलेला आदेश रदद केल्याबाबत चा आदेश मला अदयाप पर्यत मीळालेला नाही. सदर प्रकरणा बाबत मा. उच्च न्यायालय, नागपुर यांची नोटीस आली नाही. गरअर्जदार यांनी मा. औद्योगिक न्यायालयाने तक्रार क्र.युएपलपी २९/१६ मध्ये झालेल्या आदेशाचे पालन केले नाही.

......

गैरअर्जदार यांनी मा. औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मला थक बाकी ची रक्कम दिली व आदेशाची अमल बजावणी न केल्यामळे गैरअर्जदार यांच्यावर कार्यवाही व्हावी ही विनंती.

तक्रारकर्त्याची सही

समक्ष

स्वाक्षरी/—

(श्रीमती आर. व्ही. मेटे )
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि.१७.०६.२०२२.

......